# पनवेल महानगरपालिका
## ता.पनवेल, जि.रायगड

**कार्यालय :-** आयुक्त मुख्यालय, २ रा मजला, देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल - ४१० २०६ दूरध्वनी क्र. 022-27458040/41/42
Email Id : panvelcorporation@gmail.com


जा.क्र.पमपा/घकवि/२५२४/प्र.क्र.१६/५७/२०२४ दिनांक :-२४/०१/२०२४

# जाहीर नोटीस

पनवेल महानगरपालिका हद्दीमध्ये स्वच्छ भारत अभियानाची जनजागृती करणेकरीता पथनाट्य सादर करणेकामी तातडीने इच्छुक पुरवठा धारक / व्यक्ती यांचे कडुन जाहीर दरपत्रके मागवित आहेत. संबंधितांनी त्यांची दरपत्रके महानगरपालिकेच्या आरोग्य विभागात दिनांक – ३०/०१/२०२४ रोजी दुपारी १२:०० वाजेपर्यंत सादर करावीत. सदर तारखे नंतर आलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामपुर्णत्वाचा कालावधी | दर (जी.एस.टी. सह) |
|---|---|---|---|
| १ | पनवेल महानगरपालिका हद्दीमध्ये स्वच्छ भारत अभियानाची जनजागृती करणेकरीता पथनाट्य सादर करणेबाबत | ०४ महिने | रु.------ |

**अटी व शर्ती:-**

१) दरपत्रकधारकाने स्वच्छ भारत अभियानाची जनजागृती करणेकरीता पथनाट्य सादर करण्याचे काम करायचा आहे

२) दरपत्रकधारकाने पथनाट्याकरीता लागणारे सर्व साहित्य व वाहतुकीच्या खर्चा सह दर सादर करायचे आहे. दरपत्रकधारकाने सादर केलेल्या दरा व्यतरिक्त इतर कोणतेही देयक महानगरपालिकेमार्फत अदा केले जाणार नाही.

३) पथनाट्य सादर करण्यात येणा-या पथकामध्ये कीमान ०५ कर्मचारी असणे बंधनकारक आहे.

४) पथनाट्यामध्ये देण्यात येणारा संदेश सुस्पष्ट व स्वच्छ भारत अभियाना संबंधित असणे बंधनकारक राहील, पथनाट्यामध्ये स्वच्छ भारत अभियाना व्यतरिक्त इतर संदेश दिल्यास सदर पथनाट्याचे देयक अदा केले जाणार नाही.

५) पथनाट्यामध्ये कोणताही अक्षेपाधिन संदेश दिल्यास दरपत्रकधारकाचे कंत्राट रद्द करून काळ्या यादीत टाकण्याची कार्यवाही केली जाईल.

६) पथनाट्याच्या ठिकाणी महानगरपालिकेच्या अधिका-याने अचानक भेट दिल्यास, भेटी अंती जर प्रयोग असमाधानकारकरित्या सादर केल्याचे निदर्शनास आल्यास सदर प्रयोगाचे मानधन दरपत्रकधारकास अदा केले जाणार नाही.

७) दरपत्रकधारकाने काम पुर्ण झाल्यानंतर पथनाट्याचे फोटो (प्रति प्रयोग किमान ०२ फोटो) व पथनाट्य सादरी कराणाचा व्हडीओ तयार करून पेनड्राईवमध्ये देयकसोबत सादर करायचा आहे.

८) विभागामार्फत वेळोवेळी दिलेल्या सुचनेचे पालन करणे दरपत्रकधारकास बंधनकारक राहील.

९) कार्यारंभ आदेश दिल्यानंतर संबंधित संस्थेने काम वेळेत व मुदतबद्ध पद्धतीने करणे आवश्यक राहील. सबळ कारणास्तव कामाच्या मुदतीमध्ये वाढ करण्याचे अधिकार महानगरपालिकेस राहतील.

१०) दरपत्रकधारके स्विकारण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार महानगरपालिकेस राहतील.

**सही /-**
**उप आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**